Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 25TH MARCH 1897.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### स्थानिक अधिकाऱ्यांस तात्पुरत्या निकडीच्या प्रसंगासाठीं पैका कर्जी काढण्यास अधिकार देण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी, स्थानिक अधिकाऱ्यांस तात्पुरत्या निकडीच्या प्रसंगासाठीं पैका कर्जी काढण्याचा अधिकार देणें योग्य आहे, त्या अर्थी ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

लहान सरनामा, व्याप्ति व सुरवात.

१. (१) ह्या आक्टास सन १८९७ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं (निकडीच्या प्रसंगीं) पैका कर्जी काढण्याबाबदचा आक्ट असें ह्मणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

दुष्काळाच्या किंवा सांथीच्या रोगांच्या प्रसंगीं, स्थानिक अधिकाऱ्यांस पैका कर्जी काढण्याचा अधिकार.

२. सन १८७९ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जी काढण्याबाबदचा आक्ट यांत किंवा त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांत कोणताही ठराव असला तरी, सदहू आक्टांत व्याख्या केलेल्या स्थानिक अधिकाऱ्यास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या आधीं घेतलेल्या मंजुरीनें, खालीं लिहिलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणासाठीं, आपल्या फंडांच्या तारणावर, पैका कर्जी काढण्याचा अधिकार आहे: तीं कारणें येणेंप्रमाणें :—

(१) दुष्काळाच्या किंवा महर्गतेच्या वेळीं मदत देणें आणि मदतीचीं कामें स्थापणें व चालू ठेवणें;

(२) कोणताही भयंकर सांथीचा रोग सुरू होऊं न देणें किंवा त्याचा प्रसार बंद करणें; आणि

(३) सदरील कारणांपैकीं कोणत्याही कारणांशीं संबंध असलेल्या किंवा त्यामुळें कराव्या लागतील त्या कोणत्याही तजविजी करणें.

शर्ती घालून देण्यांचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा अधिकार.

३. (१) गेल्या शेवटच्या कलमाअन्वयें घावयाचें दरेक कर्ज, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस ज्या कोणत्याही अटी व शर्ती घालून देणें योग्य वाटेल त्या अटींस व शर्तींस पात्र केलें जाईल.

(२) विशेष रीतीनें आणि पोटकलम (१) यांतील ठरावांस साधारणपणें बाध न येतां, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस सामान्य किंवा विशेष हुकुमांच्या द्वारें खालील बाबती ठरविण्याचा अधिकार आहे: ह्मणजे—

(अ) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं किंवा स्थानिक सरकारानें ह्या आक्टाअन्वयें ज्या शर्तींप्रमाणें पैका कर्जी दिला असतां चालेल त्या शर्ती ठरविण्याचा अधिकार आहे ;

(ब) अशीं कर्जें ज्या शर्तींवर द्यावयाचीं असतील त्या शर्ती दाखल करण्याची व त्या अमलांत आणण्याची रीत ठरविण्याचा अधिकार आहे ;

(क) अशा कर्जानें केलेलीं कोणतींही कामें किंवा केलेला कोणताही खर्च तपासण्याबद्दल अधिकार आहे;

(ड) अशीं कर्जें ज्या हप्त्यांनीं परत द्यावयाचीं ते हप्ते, त्या कर्जावर घ्यावयाचें व्याज, आणि अशीं कर्जें परत द्यावयाची व त्यांवरील व्याज द्यावयाची रीत व मुदत ठरविण्याचा अधिकार आहे; आणि

(इ) अशा कर्जासंबंधानें कोणते विशेष ठेवावयाचे ते ठरविण्याचा अधिकार आहे.

सन १८७९ चा आक्ट ११वा, कलम ६ लागू असणें.

४. सन १८७९ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्ज काढण्याबाबदचा आक्ट, ह्याच्या ६ व्या व ७ व्या कलमांतले ठराव, ह्या आक्टाअन्वयें पैका कर्जी काढण्याच्या बाबतींत लागू होतील.

ह्या आक्टाच्या सुरवातीच्या आधीं दिलेल्या कर्जात हा आक्ट लागू असणें.

५. जें कोणतेंही कर्ज तारीख १ माहे जानेवारी सन १८९७ नंतर आणि ह्या आक्टाच्या सुरवातीच्या आधीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं अगर त्यांच्या मंजुरीनें, कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्यास, ह्यांत पूर्वी सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याही कारणासाठीं दिलेलें असेल, त्या कर्जास ह्या आक्टांतील ठराव लागू होतील; आणि असें दरेक कर्ज ह्या आक्टाअन्वयें देण्यांत आलें आहे असें समजलें पाहिजे.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जी काढण्याबाबदचा आक्ट (सन १८७९ चा ११ वा) याअन्वयें, स्थानिक अधिकाऱ्यांस, "त्यांना जीं कोणतींही कामें करण्याचा कायदेशीर रीतीनें अधिकार असेल तीं कामें करण्यासाठीं" पैका कर्जी काढण्याचा अधिकार दिलेला आहे; आणि त्या आक्टाच्या ८ व्या कलमांत असें ठरविलें आहे कीं, त्या आक्टांत किंवा आक्टाअन्वयें ठरविलें आहे त्याशिवाय इतर रीतीनें, स्थानिक अधिकाऱ्यानें कोणत्याही कारणासाठीं आपल्या फंडांवर पैका कर्जी काढूं नये किंवा दुसऱ्या रीतीनें त्यावर बोजा घालूं नये. आणि अशा मनाईविरुद्ध जो कोणताही करार करण्यांत येईल, तो रद्दबातल समजला जाईल असें त्याच कलमांत स्पष्टपणें ठरविलें आहे. हे ठराव, लोकल बोर्ड आणि म्युनिसिपल कमिट्या ह्यांचें नियमन करणाऱ्या विशेष आक्टांतील ठरावांबरोबर वाचिले तर, त्यांअन्वयें, सदर्हू प्रकारच्या ज्या बोर्डाला किंवा कमिटीला तात्पुरती फंडांची कमताई असून दुष्काळाच्या किंवा महर्गतेच्या वेळीं मदत देण्याच्या अगर गांठीच्या तापाच्या सांथीसारखा सांथीचा चालू झालेला उपद्रव हटवण्याच्या कारणासाठीं लागणारा निकडीचा खर्च भागविण्याची जरूर असेल त्या बोर्डाला किंवा कमिटीला कायदेशीर रीतीनें पैका कर्जी काढतां येईल किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. ह्या संबंधाच्या सर्व शंका दूर करणें हा ह्या मसुद्याचा उद्देश आहे. एका विवक्षित म्युनिसिपालिटीला मोठ्या निकडीच्या कारणाकरितां पैका कर्जाऊ देणें वाजवी आहे असें हिंदुस्थान सरकारास वाटल्यावरून त्यांनीं त्या म्युनिसिपालिटीस आलीकडे जें कर्ज दिलें आहे तें कायदेशीर ठरविण्याकरितां रकम ५ ही दाखल केली आहे.

तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८९७. (सही) जे. वेस्टलँड.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविलें आहे :—

सन १८७९ चा आक्ट १, कलम ७ अ, यानंतर नवीन कलम दाखल करणें.

१. सन १८९४ च्या ६ च्या आक्टाच्या २ च्या कलमावरून सुधारलेला सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट, कलम ७ अ, यानंतर खालील कलम जास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

सन १८७९ च्या ११ च्या आक्टाअन्वयें पैका कर्जी घेण्यासंबंधीं काढलेले बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले.

"७ ब. (१) या आक्टांत कोणताही ठराव असला तथापि, सन १८७९ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जी काढण्याबाबदचा आक्ट, किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणारा दुसरा कोणताही कायदा, याच्या ठरावांअन्वयें, बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले यांच्याद्वारें पैका कर्जी काढणाऱ्या कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्याला, त्यानें काढलेल्या बांडांच्या, डिबेंचरांच्या किंवा इतर दाखल्यांच्या एकंदर रकमेवर दर शेंकडा आठ आणे ड्यूटी अशा कर्जाच्या संबंधानें द्यावी लागेल, आणि अशा बांडांस, डिबेंचरांस किंवा इतर दाखल्यांस स्टांप लावण्याची जरुरी नसून त्यांवर आणखी, ते नवीन करते वेळीं, अनेकांऐवजीं एक सबंध करते वेळीं, एकाऐवजीं अनेक करते वेळीं, किंवा इतर प्रसंगीं कोणतीही जास्त ड्यूटी पडणार नाहीं.

"(२) ज्या ठरावांवरून पोटकलम (१) यांत कित्येक बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले यांस, स्टांप लावण्याची व जास्त पडणाऱ्या कांहीं ड्यूटीची माफी दिली आहे ते ठराव, त्यांत सांगितल्या प्रकारचें जें कर्ज फेडल्यावांचून राहिलें असेल त्या सर्व कर्जाच्या बांडांस, डिबेंचरांस किंवा इतर दाखल्यांस लागू होतील, आणि असे सर्व बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले, मग त्यांस स्टांप लावलेला असो किंवा नसो, कायदेशीर होतील.

"मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ज्या स्थानिक अधिकाऱ्यानें असे बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले काढले असतील त्याला, सन १८७९ च्या हिंदुस्थानच्या स्टांप आक्टाअन्वयें, त्याची या आक्टावरून सुधारणा होण्यापूर्वीं, त्यांबाबद पडावयाची जी ड्यूटी ती अगोदर दिलेली नसेल किंवा त्या आक्टाअन्वयें काढलेल्या हुकुमानें माफ केलेली नसेल, तेव्हां तिची यांतील कोणत्याही ठरावावरून माफी मिळते असें समजूं नये."

सन १८७९ चा आक्ट १, परिशिष्ट १, यांत नंबर ६० ची सुधारणा करणें व नंबर ६० अ हा नवीन दाखल करणें.

२. सदरहू आक्टाचें परिशिष्ट १, नंबर ६०, यांत सर्व ठिकाणीं "लीस" हा शब्द विभक्तिप्रत्ययांसह व त्यापूर्वीचा लगतचा "किंवा" हा शब्द यावरून रद्द केले आहेत ; आणि सदरहू नंबर ६० यानंतर खालील नंबर जास्त दाखल केला पाहिजे, तो येणेंप्रमाणें :—

| | |
|---|---|
| "६० अ. लीसची ट्रान्सफर, असेन्मेंटाच्या द्वारें, पोट-लीसच्या द्वारें नव्हे. | कन्व्हेयन्सला पडते तीच ड्यूटी. (नंबर २१)." |

---

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

या मसुद्यावरून स्टांपाच्या कायद्यांत लहान पण बऱ्याच महत्त्वाच्या दोन सुधारणा करण्याचा विचार आहे, व त्या हिंदुस्थान सरकाराच्या मतें, विलंब न होतां अमलांत येणें फार इष्ट आहे.

२. पहिल्या रकमेवरून सन १८७९ च्या हिंदुस्थानच्या स्टांप आक्टांत एक नवीन कलम दाखल करून असें ठरविण्याचें योजिलें आहे कीं, स्थानिक अधिकाऱ्यानें काढलेल्या बांडांस किंवा डिबेंचरांस, पहिल्या प्रथम, किंवा तें नवीन करून देते वेळीं, एकाऐवजीं अनेक करते वेळीं, अनेकांऐवजीं एक सबंध करते वेळीं किंवा इतर प्रसंगीं निरनिराळा स्टांप लावण्याची गरज नाहीं, संबंध असलेल्या स्थानिक अधिकाऱ्यानें त्या बांडांच्या किंवा डिबेंचरांच्या एकंदर रकमेवर पडणारी किंमतीप्रमाणें स्टांप ड्यूटी ( दर शेंकडा आठ आणे ) एकदम देणें बस आहे. तसेंच हे ठराव, स्थानिक अधिकाऱ्यांनीं घेतलेलें जें कर्ज फेडल्यावांचून राहिलें असेल त्याच्या संबंधानें अगोदरच काढलेल्या बांडांस व डिबेंचरांसही लागू करण्याचें योजिलें आहे : मात्र सदरहू आक्ट हल्लीं आहे त्याप्रमाणें त्याअन्वयें द्यावयाची पूर्ण ड्यूटी दिलेली आहे किंवा ८ व्या कलमाअन्वयें काढलेल्या हुकुमानें माफ केलेली आहे अशा समजुतीवर हा ठराव केला आहे.

३. बाकी राहिलेल्या रकमेचा उद्देश, सन १८७९ च्या १ ल्या आक्टांत कांहीं व्यंग राहिलेलें असून त्याच्यायोगें स्टांप महसुलाची बरीच रकम बुडाली असावी असा अजमास वाटतो तें दूर करावें असा आहे. लीसच्या असैन्मेंटावर हल्लीं सदरहू आक्टाच्या १ ल्या परिशिष्टांतील नंबर ६० मध्यें ठरविलेला ड्यूटीचा हलका दर घेण्यांत येतो व या ठरावाच्यायोगें लीसनें धारण केलेल्या मोठ्या व किंमतवान मालमत्तेचें कन्व्हेयन्स केवळ नांवाची स्टांप ड्यूटी देऊन ट्रान्सफर करतां येतें. याबद्दल स्पष्ट ठराव करण्याकरितां एक निराळा नंबर ( ६० अ ) जास्त दाखल करण्याचें योजिलें आहे, व तसेंच नंबर ६० मधील लीस शब्दावरील हवाले रद्द केले आहेत.

तारीख २ माहे मार्च, सन १८९७. जे. वेस्टलॅण्ड.

(True translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.